# संशोधकांनी विज्ञानाचा इतिहास समजून घ्यावा

## प्र-कुलगुरू डॉ. पाटील; न्यू कॉलेजमध्ये कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २१ : 'खगोलशास्त्र भविष्यकाळात महत्त्वाचे ठरणारे असून प्राचीन भारतामधील संशोधकांनी विज्ञानाचा इतिहास समजून घेणे आवश्यक आहे,' या अभ्यासाच्या जोरावरच भविष्यातील संशोधनामध्ये कल्पत्तेचा वापर करून अनेकविध गोष्टी निर्माण करता येतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट ॲकॅडमी आणि आयुकातर्फे न्यू कॉलेजमध्ये आयोजित एस्ट्रॉनॉमी सायन्स अँड सोसायटी या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे संचालक डॉ. पी. के. पाटील होते. डॉ. पाटील म्हणाले, 'नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने एमएसएफडीए आणि आयुका या संस्था महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.' डॉ. पी. के. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, कल्याणी गोखले, अपूर्वा बर्वे, पुष्पा खरे, दुब्रा सेकिया, विनय पाटील, आर. डी. पाटील उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले यांनी स्वागत केले. प्रा. अनिता मगर-पवार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. डी. कांबळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 APR 2024
पुढारी

कोल्हापूर 22/4/2024



कल्याणी पाटील वैष्णवी पाटील साक्षी कुंभार आकांशा कातकडे हार्दिक राजेभोसले

# शिवाजी विद्यापीठाच्या ५ रग्बी खेळाडूंची भारतीय संघात निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

फ्रान्स येथे १० ते १२ जूनदरम्यान होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या ४ महिला खेळाडू व १ पुरुष खेळाडूची निवड झाली आहे.

कल्याणी पाटील, वैष्णवी पाटील, साक्षी कुंभार (सर्व न्यू कॉलेज), आकांशा कातकडे व हार्दिक राजेभोसले (एल. बी. एस. कॉलेज, सातारा) या सर्वांची निवड भारतीय विद्यापीठ रग्बी संघामध्ये झाली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच भारतीय विद्यापीठाच्या एका सांघिक क्रीडा प्रकारामध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरिता चार खेळाडूंचा समावेश होणे अभिमानास्पद आहे. याचबरोबर शुभांगी गावडे, स्वाती माळी यांची राखीव क्र. १ व २ साठी निवड झाली आहे.

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आणि खेलो इंडिया या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या महिला व पुरुष संघाने अतिशय उल्लेखनीय कामगिरी बजावून, शिवाजी विद्यापीठाचे वर्चस्व अग्रक्रमांकावर कायम ठेवले आहे. खेळाडूंना कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण प्रा. डॉ. शरद बनसोडे यांनी अभिनंदन केले. जिल्हा संघटना अध्यक्ष अमर सासणे, दीपक पाटील, संग्रामसिंह मोरे, अर्जुन पिटुक, राहुल लहाने यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
22 APR 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पुण्यनगरी २२/४/२०२४

# शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंची भारतीय रग्बी संघात निवड


कल्याणी पाटील


वैष्णवी पाटील


साक्षी कुंभार


आकांशा कातकडे


हार्दिक राजेभोसले

कोल्हापूर : प्रतिनिधी

फ्रान्स येथे दि. १० ते १२ जूनदरम्यान होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या ५ खेळाडूंची निवड झाली आहे. यामध्ये कल्याणी पाटील, वैष्णवी पाटील, साक्षी कुंभार (सर्व न्यू कॉलेज, कोल्हापूर), आकांक्षा कातकडे आणि हार्दिक राजेभोसले (एलबीएस कॉलेज, सातारा) यांचा समावेश आहे. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच भारतीय विद्यापीठाच्या एका सांघिक क्रीडा प्रकारामध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरिता शिवाजी विद्यापीठाचे ५ खेळाडूंचा समावेश झाला आहे.

याशिवाय शुभांगी गावडे आणि स्वाती माळी यांचीही राखीव खेळाडू म्हणून निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आणि खेलो इंडिया या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या महिला व पुरुष संघाने अतिशय उल्लेखनीय कामगिरी केली होती.

या खेळाडूंना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी शुभेच्छा दिल्या. जिल्हा संघटना अध्यक्ष अमर सासने, दीपक पाटील, संग्रामसिंह मोरे, अर्जुन पिटुक, राहुल लहाने यांचे मार्गदर्शन मिळाले.